ISSN - 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume - XIV
Issue - I
January - March - 2025

MARATHI - II/ HINDI PART - I

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

Peer Reviewed Referred and
UGC Listed Journal No. 40776

Single Blind Review / Double Blind Review

Impact Factor / Indexing
2023 - 7.428
www.sjifactor.com

EDITOR
Dr. Vinay Shankarrao Hatole
Assistant Professor, International Center of Excellence in Engineering
& Management (ICEEM) College, Waluj, Chhatrapati Sambhajinagar. (MS)

PUBLISHED BY

AJANTA PRAKASHAN
Jaisingpura, Chhatrapati Sambhajinagar. (MS)

# CONTENTS OF MARATHI PART - II


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | शारिरिक शिक्षण आणि लैंगिक समानता<br>**Mrs. A. G. Thanedar** | १-५ |
| २ | ग्रामीण भागाती असंघटित क्षेत्रातील महिलांच्या सक्षमीकरणातील अडचणींचा एक अभ्यास<br>**कु. ऐश्वर्या सुरेश सन्नाप**<br>**प्रा. डॉ. गंगाधर चव्हाण** | ६-१० |
| ३ | छत्रपती राजर्षी शाहू महाराजांचा महिला सबलीकरण विषयक दृष्टिकोन: एक सूक्ष्म अभ्यास<br>**डॉ. अरुण योगेश्वर जाधव** | ११-१५ |
| ४ | लैंगिक असमानता आणि महिलांचे आर्थिक सक्षमीकरण<br>**अनुराधा रामराव गुजर** | १६-२२ |
| ५ | कामाच्या ठिकाणी महिला लैंगिक छळाची समस्या-एक ऐतिहासिक दृष्टिक्षेप<br>**डॉ. अरुण सदाशिव कटकोळे** | २३-२९ |
| ६ | संकल्पना, लोकसंख्या, आरक्षण आणि त्यांच्या झेंड्यातील बदल: एक अभ्यास<br>**अवधूत रामचंद्र गंगधर** | ३०-३७ |
| ७ | महिला आणि हैदराबाद मुक्ती संग्राम लढा<br>**Dr. Bijaysing K. Bhabardode** | ३८-४१ |
| ८ | स्त्रीयांवर होणाऱ्या कौटुंबिक हिंसाचाराचा सामाजिक अभ्यास<br>**डॉ. भुरके नागोराव संभाजी** | ४२-४८ |
| ९ | १९४७ नंतरची भारतीय महिला आणि सद्यस्थिती<br>**डॉ. चैतन्य शंकर कांबळे** | ४९-५३ |
| १० | महिला अत्याचार आणि कायदे<br>**प्रा. डॉ. ज्ञानेश्वर सोनवणे** | ५४-५८ |
| ११ | स्वातंत्र्यपूर्व काळातील भारतातील स्त्रीवादी चळवळीचा विकास<br>**गणेश शिवलाल माळी** | ५९-६३ |
| १२ | स्त्रियांवर होणाऱ्या अत्याचाराचे समाजशास्त्रीय विश्लेषण<br>**प्रा. डॉ. गंगाधर बालु चव्हाण** | ६४-७० |
| १३ | लैंगिक असमानता आणि मानसिक आरोग्य : एक संशोधनपर अभ्यास लेख<br>**सहा. प्रा. गोपाल यशवंत कबनूरकर** | ७१-७४ |

# CONTENTS OF MARATHI PART - II


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १४ | घरगुती हिंसा: कारणे, परिणाम आणि उपाय<br>**श्री. कमलाकर मारुती जाधव**<br>**डॉ. प्रतिभा देसाई** | ७५-८० |
| १५ | कौटुंबिक हिंसाचाराचा समाजशास्त्रीय अभ्यास<br>**डॉ. कन्नाडे ममता कार्तिक** | ८१-८४ |
| १६ | स्त्रियांचा लैंगिक छळ प्रतिबंध कायदा - १०१३ संदर्भातील कोल्हापूर महानगरपालिकेतील महिला कर्मचारी (दुय्यम श्रेणी) साक्षरता: समाजशास्त्रीय अभ्यास<br>**किशोर आनंदराव गुरव**<br>**प्रा. (डॉ.) प्रतिभा बा. देसाई** | ८५-९० |
| १७ | ग्रामीण भागातील महिलांच्या सक्ष्मीकरणामध्ये येणाऱ्या अडथळ्यांचा अभ्यास<br>**दौंड कोमल नामदेव** | ९१-९५ |
| १८ | भारतातील मुलींच्या सर्वांगीण सबलीकरणासाठी विविध राज्यांनी राबवलेल्या योजनांचा एक आढावा<br>**प्रा. क्षितीज मिरासाहेब जाधव** | ९६-१०१ |
| १९ | महिला सबलीकरण आणि महिलांसंदर्भातील कायदे<br>**लक्ष्मी धनपाल कोळी** | १०२-१०७ |
| २० | सरकारी योजनेअंतर्गत महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणातील बदल<br>**माधुरी मल्लिकार्जुन वाली**<br>**प्रा. विनायक वनमोरे** | १०८-११२ |
| २१ | भारतीय स्त्रीवाद व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांची प्रस्तुतता<br>**डॉ. विजया प्रशांत पवार** | ११३-११८ |
| २२ | ग्रामीण भागातील महिलांमधील आर्थिक सक्षमीकरणाचा अभ्यास<br>**कु.मिताली विशाल कलगुटगी**<br>**प्रा. डॉ. संतोष शेळके** | ११९-१२४ |
| २३ | लिंगभेदाबाबत घटनात्मक कायदे आणि तरतुदी<br>**प्रो. (डॉ.) सौ. एन. एस. गायकवाड** | १२५-१३२ |
| २४ | मुस्लिम सत्यशोधक समाज आणि भारतीय मुस्लिम स्त्रीवादी चळवळ<br>**निलोफर आदम मुजावर** | १३३-१३८ |

# १५. कौटुंबिक हिंसाचाराचा समाजशास्त्रीय अभ्यास

**डॉ. कन्नाडे ममता कार्तिक**
समाजशास्त्र विभागप्रमुख, राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज, कोल्हापूर.

**प्रस्तावना**

कुटुंबसंस्था ही समाजातील महत्त्वाची सामाजिक संस्था आहे. सर्वच मानव समाजात कुटुंबसंस्थेस केंद्रीय स्थान प्राप्त झालेले आहे कारण कुटुंब संस्था ही व्यक्ती व समाज या दोघांच्याही दृष्टीने महत्त्वाचे कार्य पार पाडत असते. मानवाने सर्वांगीण सुरक्षिततेच्या दृष्टीने कुटुंबसंस्थेची स्थापना केली. परंतु काही व्यक्तीच्या दृष्टीने कुटुंब ही त्रासदायक संस्था ठरते. कारण त्यांना कौटुंबिक हिंसाचारास तोंड द्यावे लागते. आजच्या स्त्रियांच्या विविध कौटुंबिक समस्या व अत्याचारांची कारणे ही इतिहास काळातील भारतीय समाजाच्या जडणघडणीत आहेत.

कौटुंबिक हिंसाचार ही एक गंभीर सामाजिक आणि मानसिक समस्या आहे. भारतात कौटुंबिक हिंसाचारास प्रामुख्याने स्त्रिया बळी पडतात. कुटुंबात स्त्रियांचा विशेषता पत्नी, सून, विधवा अशा स्त्रियांचा मोठ्या प्रमाणावर छळ होत असला तरी पुरुष देखील घरगुती अत्याचाराला बळी पडतात पण महिलांच्या तुलनेत पुरुषांचे प्रमाण कमी असलेले पहावयास मिळते. महिलावरील हिंसाचार हे मानवी हक्काचे उल्लंघन आणि महिलावरील भेदभावाचा एक प्रकार आहे.

**कौटुंबिक हिंसाचाराचा अर्थ**

**ॲन्थोनी गिडीन्स**

कुटुंबातील एका सदस्याने दुसऱ्या एक किंवा अनेक सदस्यांच्या विरोधात केलेला शारीरिक दुरुपयोग म्हणजे कौटुंबिक हिंसाचार होय.

**कौटुंबिक हिंसाचारापासून स्त्रियांचे संरक्षण अधिनियम कायदा 2005**

व्यथित स्त्रीच्या शारीरिक किंवा मानसिक आरोग्यास, सुरक्षिततेस, एकूण जीवितास, कल्याणास धोकादायक परिस्थितीत नेणारे वातावरण तसेच व्यथित स्त्रीच्या जीवनास किंवा कोणत्याही अवयवास घातक आणि उपद्रवी ठरेल अशी वागणूक, स्त्रीचा लैंगिक छळ, लैंगिक दुरुपयोग, शाब्दिक किंवा भावनिक छळ, आर्थिक छळ किंवा आर्थिक फायद्यापासून वंचित ठेवणे तसेच आर्थिक कारणासाठी दुरुपयोग होत असेल तर तो कौटुंबिक हिंसाचार समजला जाईल. कौटुंबिक हिंसाचाराची अशी व्यापक व्याख्या 2005 च्या कायद्यात केली आहे.

कौटुंबिक हिंसाचार कायदा प्रामुख्याने पत्नी किंवा महिला लिव्ह-इन भागीदारांना, पती किंवा पुरुष लिव्ह-इन भागीदार यांच्याकडून, त्याच्या नातेवाईकांसह घरगुती हिंसाचारापासून संरक्षण करतो. बुद्धिमत्ता, शारीरिक क्षमता, सर्जनशीलता, कष्ट करण्याची

धमक इत्यादींबाबत पुरुषांपेक्षा कोणत्याही बाबतीत कमी नसताना स्त्रीला पुरुषांपेक्षा कमी लेखण्याची वृत्ती एकविसावे शतकातही कायम आहे. हाच स्त्रियांवरील मूलभूत हिंसाचार आहे. थोड्याफार फरकाने जगात पुरुषप्रधान समाज व्यवस्था रूढ असून स्त्रीचा दर्जा पुरुषाच्या तुलनेत गौण आहे. स्त्री ही पुरुषाची मालमत्ता आहे, जिचा तो वाटेल तसा वापर करू शकतो. ही मालकी हक्काची अमानुष भावना आजही दिसून येते. बहुसंख्य पुरुष स्त्रियांच्याकडे परंपरागत दृष्टिकोणातूनच पाहतात. एवढेच नव्हे तर खुद्द स्त्रीच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण पुरुषप्रधान समाजात होत असल्याने आपण पुरुषापेक्षा गौण आहोत, आपणास पुरुषाचे संरक्षण कवच आवश्यक आहे असे स्त्रीला असे वाटू लागते. पितृसत्ताक समाज व्यवस्थेमध्ये पुरुषांचे महत्त्व व अधिकार स्त्रियांपेक्षा जास्त असतात. अशा समाजात स्त्रियांच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण अशी होते की नवरा हा श्रेष्ठत असतो. त्याची तक्रार कोणाकडे करता येत नाही असे ठाम मत झाले आहे.

कोणत्याही समाजातील निम्मी म्हणजे जवळपास ५० टक्के लोकसंख्या ही स्त्रियांची आहे. देशाला स्वातंत्र्य मिळून 79 वर्ष झाली तरी तिच्यावर होणाऱ्या हिंसाचारात फारसा फरक पडलेला नाही. कोणत्याही समाजातील स्त्रीवर होणारे अत्याचार हे त्या समाजातील पुरुषांच्या तुलनेत तिला कोणते हक्क मिळतात व कोणती कर्तव्ये पार पाडावी लागतात याच्याशी निगडित आहेत. वैदिक कालखंडात स्त्रीचा दर्जा हा पुरुषांच्या बरोबरीचा होता. तिला सर्व प्रकारचे स्वातंत्र्य व अधिकार होते. पण बदलत्या परिस्थितीत विविध कारणांनी समाजातील मूल्यांत बदल होत गेले आणि स्त्रियांना धार्मिक हक्काबरोबरच इतरही हक्क नाकारले गेले व तिचे परावलंबन वाढले. पुरुषप्रधान संस्कृती आपले हक्क गाजवू लागली. स्त्रियांच्या संदर्भात अनेक अमानुष चालीरीती व परंपरा सुरू झाल्या व स्त्रीचे स्थान गौण झाले. मुलगी म्हणजे जबाबदारी वाटू लागली.

भारतीय समाजात फार पूर्वीपासून वधू मूल्याची प्रथा अस्तित्वात होती पण आज स्त्री पुरुष प्रमाणामध्ये विषमता निर्माण झाल्यामुळे या विषमतेमध्ये मुलींचे प्रमाण कमी असल्यामुळे प्रत्यक्ष विवाहाच्या वेळी हुंडा मागितला जात नाही. पण लग्नामध्ये वर पक्षाची वधू पक्षाकडून ऐपतीप्रमाणे पाहुणचाराचीअपेक्षा ठेवली जाते. मुलीचा विवाह होताना विवाहामध्ये वरपक्षाचा अधिक वर चष्मा असतो. लग्नामध्ये पाहुणचार न झाल्यास लग्नानंतर मुलींचा अपमान तसेच तिची मानसिक कोंडी केली जाते.

**विवाहविषयक पारंपरिक रितीरिवाज**

कौटुंबिक हिंसाचारामध्ये स्त्रियांच्या संदर्भात केल्या जाणाऱ्या गैरवर्तनाचाही समावेश होतो. कौटुंबिक हिंसाचार कायद्यामध्ये घरगुती हिंसाचाराचा एक प्रकार म्हणून शाब्दिक हिंसाचा समावेश केला आहे. त्यामुळे शाब्दिक गैरवर्तन कायदेशीररित्या महिलावरील हिंसाचार आहे.

**कौटुंबिक हिंसाचाराचे प्रकार**

महिलावरील कौटुंबिक हिंसाचाराचे प्रामुख्याने शारीरिक, लैंगिक, शाब्दिक, आर्थिक आणि भावनिक अत्याचार असे प्रकार पहावयास मिळतात.

**शारीरिक हिंसा**

शारीरिक हिंसा हिंसाचाराचा हा प्रकार सर्वांना परिचित आहे. अशा हिंसाचारामध्ये स्त्रीच्या शरीराला चट्टे देणे, जखम करणे, मारहाण करणे तसेच स्त्रीला बुक्का मारणे, लाथ मारणे, चावणे, गुद्धे मारणे, ढकलणे, लोटणे किंवा हानी पोहोचवण्यासाठी कशाचा तरी वापर करणे यासारख्या कृत्यांचा समावेश होतो.

**लैंगिक हिंसा**

लैंगिक हिंसाचारामध्ये स्त्रियावर लैंगिक अत्याचार, बळजबरी, वैवाहिक बलात्कार (याला कायद्याच्या चौकटीत मान्यता नाही), जबरदस्तीने शारीरिक संपर्क करणे, अश्लील फोटो काढणे, अनैसर्गिक कृत्य करणे इ.

**मानसिक हिंसा**

मानसिक हिंसा देखील शारीरिक हिंसे इतकेच हानिकारक असू शकते. या हिंसेमध्ये मानसिक त्रास देणे, घाबरवणे, अपमान करणे, धमकावणे, मानसिक कल्याणावर हल्ला करणे इत्यादी हिंसेचा यामध्ये समावेश होतो. यामुळे स्त्रीचा आत्मविश्वास कमी होऊ शकतो व एकटेपणाची भावना निर्माण होते.

**आर्थिक हिंसा**

आर्थिक हिंसेचा बहुतांश वेळेस कौटुंबिक हिंसाचारात दुर्लक्ष केले जाते. यामध्ये आर्थिक संसाधनावर नियंत्रण ठेवणे, हुंडा मानापनाच्या वस्तूंची मागणी करणे, संगोपन/ पालन पोषण न करणे, नोकरीवर जाऊ न देणे, वेतनाचे किंवा मजुरीचे पैसे काढून घेणे, घरातून बाहेर काढणे, घरातील वस्तू वापरून देणे इत्यादी

**कौटुंबिक हिंसाचाराची कारणे**

भारतातील कौटुंबिक हिंसाचाराची विविध कारणे पहावयास मिळतात. प्रामुख्याने लैंगिक असमानता, लिंगभेद, बेरोजगारी, गरिबी, शिक्षणाचा अभाव, उत्पन्नाचा अभाव, पितृसत्ताक कुटुंब पद्धती, व्यसनाधीनता, परावलंबन, वंधत्व, संशयी वृत्ती, हुंडा प्रथा, मानसिक अस्थिरता, विवाहबाह्य संबंध इ. कारणे ही कौटुंबिक हिंसाचारास जबाबदार आहेत.

**कौटुंबिक हिंसाचाराचे परिणाम**

कौटुंबिक हिंसाचाराचे महिलावर, कुटुंबावर व पर्यायाने समाजावर दीर्घकालीन परिणाम होतात. अनेक वेळेला समाजात असे दिसून येते की शारीरिक हिंसाचारामध्ये महिलांच्या शरीरावर व मेंदूवर गंभीर परिस्थितीपर्यंत दुखापत होत असते. यामध्ये स्त्रीला अपंगत्व येऊ शकते ती चिंता किंवा नैराश्यात जाऊ शकते तसेच गंभीर प्रकरणांमध्ये अशा हिंसाचारामुळे आत्महत्येचे विचार किंवा प्रयत्न देखील होऊ शकतात. शिवाय याचा मुलावरही परिणाम होतो.

मुलावर घरगुती हिंसाचाराचा परिणाम जेव्हा ते त्यांच्या आईच्या गर्भाशयात असतात तेव्हाच सुरू होत असतो. त्यामुळे बाळाचे वजन कमी होणे, अकाली जन्म होणे, जास्त रक्तस्राव होणे, शारीरिक आघात आणि भावनिक ताण यामुळे अकाली प्रसूती आणि कमी वजनाची बाळ देखील जन्माला येऊ शकतात. जे मूल त्यांच्या घरात कौटुंबिक हिंसाचार पहात असतात त्यांच्या सर्वांगीन विकासावर

परिणाम होतो. असे मूल भीतीच्या स्थितीत राहत असतात आणि बाल शोषणाला बळी पडण्याची शक्यता जास्त असते. भविष्यात असे मूल हिंसक स्वभावाचे बनू शकतात. अशा मुलांवर शारीरिक परिणाम देखील होतो. जसे डोकेदुखी, पोट दुखी यासारख्या तक्रारी होऊ शकतात. तसेच त्यांच्या स्वभाव चिडचिडा होऊ शकतो. काही मुलांमध्ये अंथरूण ओले करण्याच्या समस्या देखील निर्माण होतात. असे मुले चिंताग्रस्त दिसू लागतात. त्यांचे लक्ष कमी असते (प्रामुख्याने अभ्यासाकडे), अशा मुलांमध्ये सतत थकवा दिसून येतो, वाईट स्वप्न पडणे, मोठ्यांबद्दल मनामध्ये अविश्वास निर्माण होणे, कुटुंबापासून आणि जवळच्या मित्रापासून देखील स्वतःला वेगळे करणे, त्यांना घरच्या परिस्थितीबद्दल लाज वाटू लागते, घरातून पळून जाण्याचा विचार करू लागतात, मुल नेहमी निराशात राहतो व स्वतःला असाह्य समजतो, मुलाचा स्वभाव आक्रमक होऊ शकतो, इतर मुलांमध्ये मिसळता येत नाही, घरी झोप न मिळाल्यामुळे शाळेत ते झोपू शकतात, ते वारंवार आजारी पडतात प्रसंगी आत्महत्या करण्याचा विचार करतात. कौटुंबिक हिंसाचाराला बळी पडलेली मुलं खूप रडतात किंवा ओरडतात, त्यांची अन्नपचनाची समस्या निर्माण होऊ शकते, ते वारंवार आजारी पडतात, त्यांना भूक लागत नाही

**निष्कर्ष**

कौटुंबिक हिंसाचार हा बळजबरी आणि नियंत्रित वर्तन प्रकार असून कौटुंबिक हिंसाचार ही व्यापक आणि गुंतागुंतीची समस्या असली तरीही समाजातील जागरूकता आणि समाजात असलेला लिंगआधारित हिंसेबद्दलचा दृष्टिकोन बदलणे आवश्यक आहे. स्त्रीने तिच्यावर हिंसाचार होत असेल तर तो निमूटपणे सहन न करता त्याचा प्रतिकार करणे आवश्यक आहे. त्यासाठी विश्वासातील व्यक्तींची मदत घेता येऊ शकते. पूर्वी आपल्याच समाजात वाईट टाकण्याची प्रथा होती, ती प्रथा हिंसाचाराची कुप्रथा बंद करण्यासाठी अमलात येऊ शकते. म्हणजे ज्या कुटुंबात स्त्रीवर हिंसाचार होतो त्या कुटुंबाला समाजाने वाळीत टाकावे.लिंगभाव समानता, सर्वांना आदर ही तत्वे जर समाजात कुटुंबाच्या माध्यमातून रुजविली गेली तर नक्कीच कौटुंबिक हिंसाचार कमी होऊ शकतो. शासनाने समाजामध्ये जागरूकता वाढण्याच्या संदर्भामध्ये प्रयत्न करणे गरजेचे आहे. शालेय शिक्षण देताना मुलांमध्ये लिंगभाव विषय संकल्पना निर्माण होणार नाही या दृष्टिकोनातून त्यांना शिक्षण देणे गरजेचे आहे. त्याचबरोबर कौटुंबिक हिंसाचारापासून स्त्रियांचे संरक्षण करण्याच्या उद्देशाने केलेल्या कायद्याची कठोर अंमलबजावणी केली पाहिजे. त्यामुळे स्त्रियांचा आत्मविश्वास वाढेल व कौटुंबिक हिंसाचारापासून स्वतःचे संरक्षण करण्यास त्या सक्षम बनतील.

**संदर्भसूची**

१. मेधा ताडपत्रीकर, ‘कौटुंबिक हिंसाचार वास्तवाला सामोरे जाताना,’ डायमंड प्रकाशन पुणे, जानेवारी २०१२

२. असीम सरोदे , ‘कौटुंबिक हिंसाचार आणि कायदा,’ मनोविकास प्रकाशन जानेवारी २०१६

३. चंद्रकांत खंडागळे, ‘ लिंगभाव आणि हिंसाचार,’ मायादेवी खंडागळे प्रकाशन,२०१९

४. https://indiankanoon.org/doc/542601/

५. https://wcd.delhi.gov.in/scert/protection-women-domestic-violence-act-2005